नियमित दिवाणी दावा क्र. १३१/२०१९
निशाणी क्र. ६६

**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,**

**माझे नांव :** रामदास विठ्ठल शेलार,
**वय :** ४६ वर्षे,
**धंदा :** शेती,
**राहणार :** बेलवंडी, घारगाव शिवलगत, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

**प्रतिवादी तर्फे सा.क्र. २ यांचा सरतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. डी. टी. मांडगे यांचे तर्फे सुरु**

१. मला न्यायालयाचे साक्षी समन्स मिळालेले आहे. मी साक्षीसमन्स वाचले असुन त्याप्रमाणे आज रोजी साक्ष देण्यासाठी आलेलो आहे. मी साक्षीसमन्स मध्ये नमुद केल्याप्रमाणे गट क्रमांक ७५६ मध्ये कोणाची प्रत्यक्ष वहिवाट आहे, हे सांगण्यासाठी आज रोजी साक्ष देण्यासाठी आलेलो आहे. वादी रघुनाथ शिंदे यांना मी ओळखतो. प्रतिवादी पोपट शिंदे, सचिन शिंदे, झुंबर शिंदे, मीना शिंदे, संदिप शिंदे व रेखा शिंदे यांना मी ओळखतो. दावा मिळकत गट क्रमांक ७५६ ही घारगाव हद्दीत आहे. गट क्रमांक ७५६ मधील पोपट गोवर्धन शिंदे व झुंबर गोवर्धन शिंदे यांच्या मिळकतीमध्ये मी २५ वर्षांपासुन नांगरट व पेरणीची कामे करतो. गट क्रमांक ७५६ मध्ये आज रोजी गहु व कांदे अशी पिके आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**वादी तर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. पठाण यांचे मार्फत साक्षीदाराचा उलटतपास सुरु-**

२. प्रतिवादी क्रमांक १ पोपट शिंदे हे माझ्या बहिणीचे पती आहेत. वादी व प्रतिवादी मध्ये दावा मिळकतीबाबत काय वाद चालु आहे, याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रमांक १ पोपट शिंदे यांचे नाव गट क्रमांक ७५५ ला नोंद आहे. पोपट शिंदे यांचे नाव गट क्रमांक ७५६ ला नोंद आहे. मी गट क्रमांक ७५५ व ७५६ चे सातबारा उतारे पाहिलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक

७५६ मध्ये वादीचे वडिल व त्यांच्या पश्चात वादी रघुनाथ शिंदे यांचे नाव नोंद झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ७५५ मधील मिळकत पोपट शिंदे यांनी खरेदी घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ७५६ मधील जमीन मिळकत वादीचे वडिलांनी विकत घेतलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ७५६ मध्ये पुर्वी वादीचे वडिल यांची कब्जेवहिवाट होती व त्यांच्या मृत्युनंतर वादीची कब्जेवहिवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रमांक १ पोपट शिंदे हे माझे जवळचे नातेवाईक असल्यामुळे त्यांच्या सांगण्यावरुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

दिनांक – १५-१२-२०२५

समक्ष श्रवणोत्तर स्वीकृत,

ROAC

PATIL PRAVIN VISHWAS

Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2025.12.15 17:36:30 +0530

(प्रविण वि. पाटील)

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

श्रीगोंदा